MHGA090018212025

**नि.फौ.मा.नं. २५२/२०२५**
**सरकार -वि-भाउुजी वाघमारे + ३७**
**नि.क. २५८**

**<u>कोर्ट विद्यमान श्री.एस.ए.भैसारे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : २५.०८.२०२४ |
| २) | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : २५.०८.२०२४ |
| ३) | फिर्यादिदार | : महाराष्ट्र शासनतर्फे, पोलीस स्टेशन, मुलचेरा ता.चामोर्शी, जि.गडचिरोली. |
| ४) | आरोपीचे नांव, आरोपीच्या(आरोपी क.०१) वडीलाचे नांव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान, इत्यादी. | : भाउुजी शिवराम वाघमारे, वय-४३ वर्षे, व्यवसाय -शेती, रा.सिंगनपेठ, तह.-अहेरी, जिल्हा- गडचिरोली. |
| | (आरोपी क.०२) | : सागर प्रकाश वाकुडकर, वय-२६ वर्षे, व्यवसाय -शेती, रा.चांदेश्वर, तह.-चामोर्शी, जिल्हा- गडचिरोली. |
| | (आरोपी क.१४) | : अशोक भिमराव नैताम, वय- २६ वर्षे, व्यवसाय -शेती, रा.आलापल्ली, तह.-अहेरी, जिल्हा- गडचिरोली. |
| | (आरोपी क.२१) | : गंगाराम रंगय्या डुबले, वय-४६ वर्षे, व्यवसाय -शेती, रा.आलापल्ली, तह.-अहेरी, जिल्हा- गडचिरोली. |
| | (आरोपी क.३३) | : चरणदास लिंगाजी झाडे, वय-४० वर्षे, व्यवसाय -शेती, रा.आलापल्ली, तह.-अहेरी, जिल्हा- गडचिरोली. |
| | (आरोपी क.१०) | : संतोष शंकर कोटरंगे, वय-३५ वर्षे, व्यवसाय -शेती, रा.नवेगांव, तह.-अहेरी, जिल्हा- गडचिरोली. |

(आरोपी क्र.०४): राजेंद्र व्यंकय्या तानसेन,
वय-३५ वर्षे, व्यवसाय -शेती,
रा.येचली, तह.-भामरागड,
जिल्हा- गडचिरोली.

(आरोपी क्र.१५): रामकृष्ण सिदाम दास,
वय-४८ वर्षे, व्यवसाय -शेती,
रा.भगतनगर, तह.-मुलचेरा,
जिल्हा- गडचिरोली.

५) (अ) ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील :

दिनांक २५.०८.२०२४ रोजी १५.०० ते १९.३० वाजताच्या दरम्यान मौजा चिचेला गावातील चिचेला ते आलापल्ली रोडच्या शेजारी असलेल्या नाल्याजवळ जगंल परिसरात शेताकडे जाणा-या येणा-या सार्वजनिक रस्त्याच्या बाजुला तुम्ही इतर आरोपींसोबत कोंबडयाची झुंज लावुन त्यावर पैशाची पैज लावुन हारजितचा जुगाराचा खेळ खेळतांना मिळुन आलात आणि त्याव्दारे तुम्ही महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याचे कलम १२ (ब) अन्वये माझे दखलक्षेत्रात गुन्हा केला व मी त्याची दखल घेतलेली आहे.

आरोपीस त्याचेवर लावण्यात आलेले आरोप त्याचे मातृभाषेत त्याला वाचून व समजावून सांगण्यात आले.

स्वा/-

(एस.ए.भैसारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

दिनांक : १०.०६.२०२६
चामोर्शी.

**<u>आरोपीचे प्रतिकथन</u> :**

प्रश्न १ ला : तुम्हाला आरोपपत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.



प्रश्न २ रा : आता तुम्हाला वाचून दाखविलेले आरोप समजले काय ?

उत्तर : होय.

प्रश्न ३ रा : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे.

प्रशन ४ था : तुम्हाला मोफत कायदेविषयक सल्ला पाहिजे आहे काय ?

उत्तर : नाही.

आरोपी क्र.०१.................

आरोपी क.०२....................

आरोपी क.१४......................

आरोपी क.२१..........................

आरोपी क.३३......................

आरोपी क.१०......................

आरोपी क.०४......................

आरोपी क.१५......................

माझे समक्ष

आरोपीची सही किंवा आंगठा
दिनांक : १०.०६.२०२६

स्वा/-
(एस.ए.भैसारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

**<u>आदेश नि.क्र.२५८ खाली</u>**

(दि. १०.०६.२०२६ रोजी पारीत)

सदर प्रकरण आज बोर्डावर घेण्यात आले. आरोपी क. ०१,०२,१४,२१,३३,१०,०४ व १५ हजर. सदर आरोपींनी दोषारोपामधील उल्लेखीत आरोप त्यांना मान्य असल्याचे कबुल केले. आरोपीने नि.क्र. २५५ ते २५७ प्रमाणे त्यांचेवर लावण्यात आलेला गुन्हा मंजुर असल्याबाबत पुरसीस सादर केलेला आहे. आरोपींना सदर गन्हा कबुल करणे बंधनकारक नाही. तसेच गुन्हा कबुल केल्यास शिक्षा होण्याबाबत मी प्रत्यक्षपणे सांगीतले. आरोपींना गुन्हा कबुलीचा परिणाम सांगीतल्यानंतर देखील गुन्हा कबुलीच्या निर्णयावर आरोपी ठाम आहे. यावरुन आरोपी कोणत्याही दबावात न येता गुन्हा कबूल केल्याचे दिसून येते. आरोपींविरुध्द महाराष्ट्् जुगार कायदयाचे कलम १२ (ब) अन्वये आरोप लावण्यात आले आहे.

आरोपी व त्याचे विधीज्ञ म्हणने ऐकले. आरोपीचा हा पहीलाच गुन्हा असल्यामुळे, घरचा एकच कमावत व्यक्ती व कमी वय असल्यामुळे कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केली. महाराष्ट्् जुगार कायदयाचे कलम १२ (ब) करीता तीन महिणे तुरुंगवासाची शिक्षा व ३००/- रुपये पर्यंत द्रवदंडाची शिक्षा नमुद केलेली आहे. परंतु आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचे अभियोग पक्षाचे कथन नाही. त्यामुळे आरोपींनी केलेला गुन्हा हा प्रथम समजुन त्यांना प्रत्यक्ष तुरुंगवासाची शिक्षा देण्याऐवजी आजच्या न्यायालयाचे कामकाज संपेपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा व

३००/- रुपये द्रवदंडाची शिक्षा देणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे आरोपींनी केलेला गुन्हयाचे स्वरूप लक्षात घेता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.



**<u>आदेश</u>**

१) आरोपी क्र. ०१,०२,१४,२१,३३,१०,०४ व १५ भाउजी शिवराम वाघमारे, सागर प्रकाश वाकुडकर, अशोक भिमराव नैताम, गंगाराम रंगयया डुबले, चरणदास लिगांजी झाडे, संतोष शंकर कोटरंगे, राजेंद्र व्यंकयया तानसेन, रामकृष्ण सिदास दास यांना महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्याचे कलम १२(ब) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरीता कलम २५२ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये आज दिनांक १०.०६.२०२६ रोजी न्यायालयाची वेळसंपेपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा व प्रत्येकी रुपये ३००/-(अक्षरी तीनशे रूपये फक्त) चे द्रव्यदंडाची शिक्षा सुनावण्यात येते.

२) दंड न भरल्यास पंधरा दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

स्वा/-
(एस.ए.भैसारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

स्थळ:-चामोर्शी.
दि. १०.०६.२०२६

**नि.फौ.मा.नं. २५२/२०२५**

| :- CERTIFICATE :- I affirm that the contents of this P.D.F file, order are same word to word, as per the original Order. | |
|---|---|
| Name | Sau. V. K. Bhagat, Jr. Clerk |
| Name of the Court | Jt. Civil Judge (Jr. Dn) & JMFC, Chamorshi |
| Date of Decision | 10/06/2026 |
| Order signed by PO. on | 10/06/2026 |
| Order uploaded on | 10/06/2026 |